पुरंदर, जि.पुणे येथे नवीन आंतरराष्ट्रीय दर्जाचे विमानतळ उभारण्यासाठी संयुक्त कंपनी / विशेष हेतु कंपनी स्थापन करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग
शासन निर्णय क्र:- मविवि १२१९/प्र.क्र.२३/२८-अ
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,मंत्रालय,
मुंबई-४०००३२.
दिनांक- ८ मार्च, २०१९

संदर्भ:- शासन निर्णय क्र.- मविवि १२१७/प्र.क.१०८/२८-अ, दिनांक ९ मे २०१८

प्रस्तावना:-

संदर्भ क्र.१ मधील शासननिर्णयान्वये पुरंदर,जि.पुणे येथे नवीन आंतरराष्ट्रीय दर्जाचे विमानतळ उभारण्यासाठी भुसंपादनास प्रशासकीय व वित्तीय मान्यता प्रदान करण्यात आली आहे. सदर विमानतळ उभारणीसाठी संयुक्त कंपनी/विशेष हेतु कंपनी स्थापन करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्याअनुषंगाने दि.५ मार्च २०१९ रोजी मा.मंत्रीमंडळाच्या विचारार्थ प्रस्ताव सादर करण्यात आला होता. मा.मंत्रीमंडळाने निदेश दिल्याप्रमाणे पुरंदर,जि.पुणे येथे नवीन आंतरराष्ट्रीय दर्जाचे विमानतळ उभारण्यासाठी संयुक्त कंपनी/ विशेष हेतु कंपनी स्थापन करण्याबाबत शासनाने पुढीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

शासन निर्णय:-

१) सामान्य प्रशासन विभागाच्या अखत्यारीतील महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीस पुरंदर विमानतळ विकासाची जबाबदारी देण्यात येत आहे.

२) सामान्य प्रशासन विभागाच्या शासन निर्णय क्र. मविवि-१२१७/ प्र.क्र. १७४/ २८-अ, दि.१० नोव्हेंबर २०१७ अन्वये राज्यातील सर्व विमानतळांसाठी महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी “नोडल एजन्सी” म्हणून घोषित करण्यात आली असल्याने पुरंदर विमानतळाच्या विकासासाठीही महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी ही नोडल एजन्सी नेमण्यात येत आहे.

३) पुरंदर, जि.पुणे येथे नवीन आंतरराष्ट्रीय विमानतळ उभारण्याकरिता संयुक्त कंपनी/विशेष हेतू कंपनी स्थापन करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

४) पुरंदर, जि.पुणे येथे नवीन आंतरराष्ट्रीय विमानतळ उभारण्याकरिता स्थापन करावयाच्या कंपनीमध्ये सिडकोचे ५१%, महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीचे १९ % , महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे १५% व पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे १५% समभाग ठेवण्यास मान्यता देण्यात येत आहे.

५) पुरंदर, जि.पुणे येथे नवीन आंतरराष्ट्रीय विमानतळ उभारण्याकरिता स्थापन करावयाच्या कंपनीमध्ये महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीचे १९ % म्हणजे रु.७६० कोटींचे समभाग राहणार असून त्यासाठी महाराष्ट्र शासनाकडून महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीस सन २०१९-२० या आर्थिक वर्षात रु.७६० कोटी उपलब्ध करुन देण्यासाठी तरतूद करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

६) यासाठीच्या संयुक्त कंपनी/विशेष हेतू कंपनीचे संचालक मंडळ खालीलप्रमाणे नेमण्यात येत आहे :

१.	उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, शहर व औद्योगिक विकास महामंडळ महाराष्ट्र मर्यादित (सिडको)	अध्यक्ष
२.	उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी मर्यादित	उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक
३.	अप्पर मुख्य सचिव (वित्त), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई	स्वतंत्र संचालक
४.	अप्पर मुख्य सचिव (उद्योग), उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग मंत्रालय, मुंबई	स्वतंत्र संचालक
५.	प्रधान सचिव (न.वि.-१), नगरविकास विभाग, मंत्रालय, मुंबई	स्वतंत्र संचालक
६.	प्रधान सचिव (विमानचालन), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई	स्वतंत्र संचालक
७.	मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ (एम.आय.डी.सी.)	संचालक
८.	मुख्य कार्यकारी अधिकारी, पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (पीएमआरडीए)	संचालक
९.	जिल्हाधिकारी, पुणे	संचालक
१०.	कार्यकारी संचालक (तांत्रिक), महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी मर्यादित	संचालक
११.	मुख्य वित्तीय अधिकारी, महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी मर्यादित	संचालक
१२.	सह व्यवस्थापकीय संचालक, सिडको	संचालक
१३.	सिडको प्रतिनिधी	संचालक
१४.	सिडको प्रतिनिधी	संचालक

७) यासाठीच्या संयुक्त कंपनी/ विशेष हेतू कंपनीचा पत्ता महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी, ८ वा मजला, जागतिक व्यापार केंद्र नं-१, कफ परेड, मुंबई - ४०० ००५ असा राहील.

८) पुरंदर, पुणे या नियोजित विमानतळासाठी आवश्यक असणाऱ्या जमिनीचे संपादन, नुकसानभरपाई व पुनर्वसन या सर्व बाबीची जबाबदारी जिल्हाधिकारी, पुणे यांची राहील.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक २०१९०३०८१३३०२६०५०७ असा आहे. हा आदेश डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकीत करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

BHARAT BUDHAJI GAWADE

Digitally signed by BHARAT BUDHAJI GAWADE
DN: c=IN, st=Maharashtra, 2.5.4.20=bc303d0b23c9b2e6456454666136340 0c4a360e6c6fbdefca273e2f5d2a43be7, postalCode=400032, street=MANTRALAYA MUMBAI, serialNumber=af4e3993e4dd3610fcb21aece361e641ad3d33d96f04d57673c4fca72eb10c92, ou=GAD, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, cn=BHARAT BUDHAJI GAWADE
Date: 2019.03.11 11:53:56 +05'30'

(भ.बु.गावडे)

महाराष्ट्र शासनाचे सह सचिव

प्रत माहितीसाठी व कार्यवाहीसाठी:-

१. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय,मुंबई.

२. अप्पर मुख्य सचिव, मुख्यमंत्री सचिवालय, मंत्रालय,मुंबई.
३. अप्पर मुख्य सचिव (वित्त), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
४. अप्पर मुख्य सचिव (उद्योग), उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई
५. अप्पर मुख्य सचिव (महसूल), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई
६. प्रधान सचिव (विमानचालन), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय,मुंबई.
७. प्रधान सचिव (न.वि.-१), नगरविकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
८. विभागीय कार्यकारी संचालक, भारतीय विमानपत्तन प्राधिकरण (पश्चिम क्षेत्र), मुंबई.
९. मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, मुंबई
१०.उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, शहर व औद्योगिक विकास महामंडळ महाराष्ट्र मर्या. मुंबई
११.उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी, मुंबई.
१२.मुख्य कार्यकारी अधिकारी, पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (पीएमआरडीए), पुणे
१३.जिल्हाधिकारी, पुणे